विनोद वि. महाराष्ट्र शासन

**<u>नि.क्र.५ खाली आदेश.</u>**
**(दिनांक :- ०१/०८/२०२५)**

०१. अर्जदाराने सदरचा अर्ज गैरअर्जदार क्र.१ ते ५ यांच्या विरुध्द आदेश ३९ नियम १ व २ दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ नूसार तात्पुरत्या मनाई हुकुमाकरिता दाखल केला आहे. अर्जदाराचे कथनानुसार तो व त्याची आई, भाऊ हे नगर भुमापन क्र.२/१/८, शीट क्र.१डी, प्लॉट मालमत्ता क्र.२/१/८ चे मालक व ताबेदार आहेत.सदर मिळकतीच्या पुर्वेस कुवारे यांचा प्लॉट, पश्चिमेस वादीच्या दुकानासमोरील जागा व नंतर दिग्रस-दारव्हा रोड, दक्षिणेस वादीच्या दुकानसमोरील जागा व नंतर दिग्रस-मनोरा रोड व उत्तरेस पांचाळ यांची जागा, अशी आहे. सदरील मिळकतीस यापुढे दावा मिळकत असे सोयीकरीता संबोधण्यात येईल. अर्जदाराच्या कथनानुसार, गैरअर्जदार क्र.३ ते ५ यांनी अर्जदाराच्या दुकानासमोर अतिक्रमण केले आहे. अर्जदाराच्या कथनानुसार, गैरअर्जदार क्र.३ यांनी दावा मिळकतीसमोर समोसे, कचोरीचे दुकान टाकले, गैरअर्जदार क्र.४ याने पानठेला टाकला आहे तर गैरअर्जदार क्र.५ याने भाजीपाल्याचे दुकान टाकले आहे. अर्जदाराच्या कथनानुसार, गैरअर्जदार क्र.३ ते ५ यांनी दावा मिळकतीसमोर अतिक्रमण करुन वाद मिळकतीस अडथळा निर्माण केला आहे. अर्जदाराच्या कथनानुसार, गैरअर्जदार क्र.३ ते ५ यांनी दावा मिळकतीसमोर अतिक्रमण केले असल्यामुळे अर्जदारांना दावा मिळकतीमध्ये जाण्या-येण्यास अडथळा निर्माण होत असून अर्जदारांना दावा मिळकतीमध्ये कसलाही व्यवसाय करणे कठीण होत आहे व अशाप्रकारे अर्जदारांचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे.

०२. अर्जदाराच्या कथनानुसार, अर्जदाराने गैरअर्जदार क्र.३ ते ५ यांना दावा मिळकतीसमोर अतिक्रमण करु नये, अशी सूचना केली असता गैरअर्जदार क्र.३ ते ५ यांनी तुझ्याने जे होईल ते करुन घे, आम्ही पोलीस स्टेशन, कोर्ट कचेरी पाहून घेऊ असे अर्जदारांना धमकावले आहे. अर्जदाराच्या कथनानुसार, अर्जदारांनी गैरअर्जदार क्र.२ यांच्याकडे दि.०२/१०/२०२४ रोजी गैरअर्जदार क्र.३ ते ५ यांच्याविरुध्द अर्ज दिला होता परंतू गैरअर्जदार क्र.२ याने त्यांच्याविरुध्द कसलीही कार्यवाही केली नाही. अर्जदाराच्या कथनानुसार, अर्जदाराच्या पक्षामध्ये तात्पुरत्या मनाई हुकुमाकरीता आवश्यक असलेले तीनही घटक आहेत. त्यामुळे अर्जदारांनी त्यांचा तात्पुपत्या मनाई हुकुमाचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

०३. त्यानुसार गैरअर्जदारांना सदर प्रकरणाची नोटीस काढण्यात आली. गैरअर्जदार क्र.१ मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी त्यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल केले नाही. गैरअर्जदार क्र.२ मुख्यधिकारी, नगर परिषद, दिग्रस यांनी त्यांचे म्हणणे अभिलेखावर नि.क्र.१९ वर दाखल केले आहे. गैरअर्जदार क्र.३ ते ५ यांनी त्यांचे लेखी म्हणणे अभिलेखावर नि.क्र.२६ वर दाखल केले आहे. गैरअर्जदार क्र.२ नगर परिषद, दिग्रस यांनी कथन केले की, सदरच्या दाव्यात त्यांना विनाकारण पक्षकार म्हणून सामील करण्यात आलेले आहे. तसेच गैरअर्जदार क्र.२ यांनी कथन केले की, सदरील दावा दाखल करण्यापूर्वीची नोटीस त्यांना देण्यात आलेली नाही. त्यामुळे सदरचा दावा खारीज करण्यात यावा. पुढे गैरअर्जदार क्र.२ याने कथन केले की, अर्जदाराने दि.०२/१०/२०२४ रोजी गैरअर्जदार क्र.२ याच्याकडे अर्जदाराच्या वाद मिळकतीसमोर गैरअर्जदारांनी अतिक्रमण केले आहे अशाप्रकारचा अर्ज दिला असल्याबाबत कबूल केले आहे. तसेच गैरअर्जदार क्र.२ याने कथन केले आहे की, मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचा आदेश दि.०४/०२/२०२५ नूसार सार्वजनिक जागेवरील अतिक्रमण निष्काशीत करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे. गैरअर्जदार क्र.२ याने कथन केले की, सदर कार्यवाही मध्ये वादीच्या दुकानापुढे असलेले अतिक्रमण काढण्यात आले आहे व अशाप्रकारे त्यांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडून मिळालेले आदेशानूसार अतिक्रमण काढण्याची कार्यवाही पूर्ण केली आहे. गैरअर्जदार क्र.२ याने अर्जदारांचा अर्ज खारीज करण्याची विनंती केली आहे.

०४. गैरअर्जदार क्र.३ ते ५ यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.२६ मध्ये कथन केले की, सदरचा दावा व अर्ज हा त्यांच्याविरुध्द विनाकारण दाखल करण्यात आलेला आहे, त्यामुळे त्यांनी तो खारीज करण्याची विनंती केली आहे. तसेच गैरअर्जदार यांनी कथन केले की, गैरअर्जदार क्र.३ याचे समोसा, कचोरीचे दुकान आहे, प्रतिवादी क्र.४ यांचा पानठेला तर प्रतिवादी क्र.५ चे भाजीपाल्याचे दुकान आहे. गैरअर्जदारांनी कथन केले की, सदरील गैरअर्जदार हे फेरीवाले म्हणून काहीवेळा करीता तेथे त्यांचे गाडे लावीत असतात. सदरील गैरअर्जदारांनी कथन केले की, गैरअर्जदार हे अर्जदारांच्या दावा मिळकतीसमोर गाडे लावीत नाहीत. गैरअर्जदारांनी कथन केले की, अर्जदारांचे कथन की, त्यांच्यामुळे अर्जदारास अडथळा होत आहे व त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे, हे खोटे असल्याचे कथन केले आहे. गैरअर्जदारांनी कथन केले की, वाद मालमत्तेचे मालक असल्याबाबतचे कोणताही

पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. गैरअर्जदारांनी कथन केले की, ते सार्वजनिक नालीवर रोडच्या कडेला त्यांचे ठेले उभाकरीता व त्यावरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत असतो. गैरअर्जदारांनी कथन केले की, सुरुवातीला सदरील रोड ३० फुट रुंदीचा होता व नंतर तो ८० फुट रुंदीचा करण्यात आला. गैरअर्जदारांच्या कथनानूसार शासनाच्या सदरच्या भूसंपादन कार्यवाहीमध्ये दाव्यातील प्लॉट हा अधिगृहीत झालेला आहे व अशाप्रकारे सदरचा प्लॉट हा आज रोजी अस्तीत्वातच नाही. गैरअर्जदारांच्या कथनानूसार अर्जदाराने दावा मिळकतीवर बेकायदेशीररीत्या टीन शेड उभारले आहेत. त्यामुळे गैरअर्जदारांनी सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०५. दोन्ही पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला.

०६. अर्जदाराच्या अर्जातील कथनेत व गैरअर्जदारांचा लेखी जबाब याचा विचार केला असता माझ्या विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. सदरील मुद्यावर मी माझे निष्कर्ष कारणासह खालीलप्रमाणे देत आहे.

| अनु. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार असे सिद्ध करतात काय की प्रथम दर्शनी केस अर्जदारांच्या पक्षात आहे ? | .......होकारार्थी |
| २. | अर्जदार असे सिद्ध करतात काय की सोयीचा तराजू अर्जदारांच्या पक्षात आहे ? | .......होकारार्थी |
| ३. | अर्जदार असे सिद्ध करतात काय की सदरचा अर्ज नामंजुर केला तर त्यांचे अपरिमीत असे नुकसान होईल ? | .......होकारार्थी |
| ४. | काय आदेश ? | अर्ज नि.क्र.५ मंजुर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करीता</u>.**

०७. दोन्ही पक्षांनी केलेल्या युक्तीवादाच्या पार्श्वभूमीवर अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदारांनी त्यांच्या कथनाच्या समर्थनास यादी निशानी ३ खाली काही दस्त दाखल केले आहेत. सदरील दस्ताचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदाराने अभिलेखावर दावा मिळकतीच्या खरेदीखताची प्रत दाखल केली आहे. त्यावरुन असे दिसून येत आहे की, अर्जदार हे दावा मिळकतीचे मालक व ताबेदार आहेत. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदाराने अभिलेखावर दावा मिळकतीच्या कर भरल्याची पावती, सन २०२३-२४ सालची दाखल केली आहे. तसेच अर्जदाराने अभिलेखावर गैरअर्जदार क्र. २ यांना तक्रारी अर्ज, दि.१२/०३/२०२४ रोजीची स्थळप्रत दाखल केली आहे. सदरील अर्जाद्वारे अर्जदाराने वाद मिळकतीसमोरील अतिक्रमणे हटविण्याबाबत विनंती केली आहे.

०८. या पार्श्वभूमीवर गैरअर्जदार क्र.२ यांनी दिलेला लेखी जबाब नि.क्र.१९ याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, गैरअर्जदार क्र.२ यांनीही अर्जदाराने वाद मिळकतीसमोरील अतिक्रमणे हटविण्याबाबत तक्रारी अर्ज दिला होता, यास दुजोरा दिला आहे. गैरअर्जदार क्र.२ याने त्याच्या लेखी जबाबात स्पष्टपणे कथन केले की, दि.१०/०२/२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या आदेशानूसार दिग्रस शहरातील अतिक्रमण हटविण्याची मोहिम राबविण्यात आली व त्यामध्ये अर्जदारांच्या वाद मिळकती समोरील अतिक्रमण सुध्दा काढण्यात आले असल्याचे कथन केले आहे. या पार्श्वभूमीवर असे दिसून येत आहे की, गैरअर्जदार क्र.३ ते ५ यांनी अर्जदारांच्या वाद मिळकतीसमोर अतिक्रमण केले होते व सदरचे अतिक्रमण गैरअर्जदार क्र.१ व २ यांनी दि.१०/०२/२०२५ रोजीच्या मोहिमेमध्ये काढून टाकण्यात आले होते.

०९. गैरअर्जदार क्र.३ ते ५ यांनी कथन केले की, त्यांनी अशाप्रकारे कसलेही अतिक्रमण अर्जदारांच्या वाद मिळकतीसमोर केलेले नाही. परंतु गैरअर्जदार क्र.२ यांनी दाखल केलेल्या लेखी जबाबाच्या पार्श्वभूमीवर सदरील कथन सत्य वाटत नाही. अभिलेखाचे अवलोकन केले असता, गैरअर्जदार क्र.३ ते ५ यांनी कथन केले की, ते फेरीवाले असून

सार्वजनिक नालीवर ठेलाद्वारे व्यवसाय करतात व दिग्रस शहरामध्ये फिरस्तीवर असतात. या पार्श्वभूमीवर अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, गैरअर्जरांनी ते अशाप्रकारे व्यवसाय करत असल्याबाबत कसलाही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. गैरअर्जदार अशाप्रकारे व्यवसाय करत असते तर ते निश्चीतच त्याबाबतची कर पावती अभिलेखावर दाखल करू शकले असते. परंतु अशाप्रकारची कसलीही कर पावती गैरअर्जदारांनी अभिलेखावर दाखल केलेली नाही.

१०. गैरअर्जदार यांनी यादी नि.क्र.३३ खाली फोटो दाखल करून ते व्यवसाय वाद मिळकतीच्या समोर करत नसल्याबाबत कथन केले आहे. सदरील फोटोचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, गैरअर्जदारांचा व्यवसाय हा वाद मिळकतीच्या समोर सुरु असल्याचे दिसून येत आहे. तसेच सदरील रस्ता ठेला हा सार्वजनिक रोडवर सुरु असून तो ५ विद्युत खांबाच्या खाली सुरु असल्याचे दिसून येत आहे. अशाप्रकारे सार्वजनिक रोडवर अतिक्रमण करुन व्यवसाय केल्यामुळे सदरील रोडने जाणाऱ्या व येणाऱ्या व्यक्तींना निश्चीतच त्रास होणार आहे. तर दुसऱ्या बाजुने तेथे येणाऱ्या लोकांच्या जीवीतास सदरच्या विद्युत खांबामुळे धोका उत्पन्न होत आहे व अचानक होणाऱ्या आपत्ती काळामध्ये तेथे येणाऱ्या लोकांच्या जीवीताची हानी नाकारता येत नाही. अशा परिस्थितीमध्ये माझ्या मते, अर्जदाराने त्यांच्या पक्षात प्रथम दर्शनी केस असल्याचे सिद्ध केले आहे. तसेच अर्जदाराने सोयीचा तराजू त्यांच्या पक्षात असल्याचे सिद्ध केले आहे. अशा परिस्थितीत अर्जदाराचा अर्ज नामंजुर केला तर निश्चीतच अर्जदाराची अपरिमीत अशी हानी होणार आहे. त्यामुळे मी वरील मुद्दा क्र. १ ते ३ यांना होकारार्थी उत्तरले आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता.</u>**

११. वरील मुद्दा क्र. १ ते ३ हे होकारार्थी उत्तरले असल्यामुळे सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मुद्दा क्र.४ च्या उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

नि.दि.दा.क्र. १५/२०२५ नि.क्र.५ खाली आदेश.

:: **आदेश** ::

१. अर्ज नि.क्र.५ मंजुर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार क्र.३ ते ५, त्यांचे हस्तक, नोकर किंवा त्यांच्या वतीने इतर कोणीही यांना वाद मिळकतीसमोर अतिक्रमण करण्यापासून तात्पुरत्या मनाई हुकुमाद्वारे प्रतिबंधित करण्यात येत आहे.

३. सदरील अर्जाचा खर्च मुळ दाव्यात गृहित धरण्यात यावा.

खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला.

Digitally signed by SACHIN SURENDRA ARADWAD
Date: 2025.08.04 18:04:18 +0530

दिनांक :- ०१/०८/२०२५.
दारव्हा, जि. यवतमाळ.

(एस. एस. आरदवाड)
दिवाणी न्यायाधिश वरीष्ठ स्तर,
दारव्हा.